# द्वितीय वर्ष कला (S. Y. B. A.)

## पहिले सत्र

विषयाचे नाव

## साहित्यविचार [DSE 1 B (3)]

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :**

१. भारतीय आणि पाश्चात्य साहित्यविचाराच्या आधारे साहित्याची संकल्पना, स्वरूप आणि प्रयोजनविचार समजावून घेणे.
२. साहित्याची निर्मितिप्रक्रिया समजावून घेणे.
३. साहित्याची भाषा आणि शैली विषयक विचार समजावून घेणे.

| घटक | तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|
| १ | • साहित्याचे स्वरूप आणि प्रयोजन<br>१. साहित्याची संकल्पना (भारतीय, पाश्चात्यांच्या व्याख्या), साहित्यातील अनुभवाचे विशेष : वास्तव आणि कल्पित यांचा संबंध, संवेदनात्मकता, भावनात्मकता, वैचारिकता, सेन्द्रीयत्व, सूचकता, विशिष्ट आणि विश्वात्मकता<br>२. प्रयोजन म्हणजे काय? मम्मटाची प्रयोजने; तसेच इच्छापूर्ती, जिज्ञासातृप्ती, विरेचन, आत्माविष्कार, अनुभवविश्वाची समृद्धी, स्वप्नरंजन, उद्बोधन, प्रचार, मनोरंजन, आनंद या प्रयोजनांचा विचार. | १ | १५ |
| २ | • साहित्याची निर्मितीप्रक्रिया<br>१. प्रतिभा, स्फूर्ती, कल्पना, चमत्कृती यांचे स्वरूप, संकल्पना आणि कार्य; साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व : संवेदनक्षमता, शैशववृत्ती, अनुभवसमृद्धी व विद्वत्ता, साहित्यिकाचा जीवनविषयक आणि साहित्य विषयक दृष्टिकोन. | १ | १५ |
| ३ | • साहित्याची सामाजिकता व भाषा<br>१. साहित्य आणि समाज, जीवनमूल्ये आणि साहित्य मूल्ये, साहित्यवाचनाची प्रक्रिया व आवश्यकता<br>२. साहित्याची भाषा : शब्दार्थांचा वक्रव्यापार; वक्रोक्ती, अलंकार, प्रतिमा, प्रतीक, प्राक्कथा<br>३. शैली विषयक स्थूल चर्चा - लेखक, आशय, साहित्यप्रकार या अनुरोधाने चर्चा | १ | १५ |

**संदर्भ साहित्य :**


१. साहित्यविचार, डॉ. अ. वा. कुलकर्णी
२. साहित्यविचार, (संपा.) डॉ. द.दि. पुंडे, डॉ. स्नेहल तावरे
३. साहित्यविचार, भालचंद्र खांडेकर
४. भारतीय साहित्यविचार, डॉ. लीला गोविलकर
५. काव्यशास्त्र प्रदीप, डॉ. स. रा. गाडगीळ
६. वाङ्मयीन शैली आणि तंत्र, म. द. हातकणंगलेकर
७. साहित्य आणि सामाजिक संदर्भ –रा. ग जाधव
८. साहित्य व सामाजिक संदर्भ – डॉ. अंजली सोमण
९. कविता आणि प्रतिमा - सुधीर रसाळ
१०. साहित्यशास्त्र स्वरूप व समस्या, डॉ. वसंत पाटणकर
११. साहित्य स्वरूप आणि समीक्षा, वा. ल. कुलकर्णी
१२. पाश्चात्य साहित्यविचार, बालशंकर देशपांडे

## द्वितीय सत्र

विषयाचे नाव

## साहित्य समीक्षा [DSE 2 B(3)]

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :**

१. साहित्य समीक्षेची संकल्पना, स्वरूप यांचा परिचय करून घेणे.
२. साहित्य आणि समीक्षा यांचे परस्पर संबंध समजावून घेणे व अभ्यासणे .
३. साहित्यप्रकारानुसार समीक्षेचे स्वरूप समजावून घेणे व अभ्यासणे .
४. ग्रंथ परिचय, परीक्षण व समीक्षण यातील फरक समजावून घेणे.

| घटक | तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|
| १ | ● समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप<br>१. समीक्षा : संकल्पना, स्वरूप आणि प्रयोजन<br>२. समीक्षा : व्याप्ती आणि प्रकार<br>३. साहित्यविचार आणि समीक्षा यातील अनुबंध<br>४. साहित्यव्यवहारातील समीक्षेचे स्थान व कार्य | १ | १५ |
| २ | ● साहित्य आणि समीक्षा यांचे परस्पर संबंध<br>१. साहित्यकृती आणि वाचक<br>२. साहित्यकृती आणि समीक्षक<br>३. समीक्षेतील साहित्याच्या आकलन, आस्वाद, विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन आणि शब्दांकन यांचे स्थान व कार्य | १ | १५ |
| ३ | ● समीक्षकाचे गुण व पाळावयाची पथ्ये<br>१. समीक्षकाचे गुण : रसिकता, प्रज्ञा, तुलनाक्षमता, चिकित्सकता, मूल्यविवेक, विश्लेषकता, व्युत्पन्नता, तुलनाक्षमता इ.<br>२. समीक्षकाने पाळावयाची पथ्ये : समीक्षाविषयाचे अवधान व तारतम्य, निकषाचे तारतम्य, व्यक्तिनिष्ठता व वस्तुनिष्ठता यांचे तारतम्य, मांडणी व शैली यांचे तारतम्य, संगती व सुसूत्रता यांचे भान, नेमकेपणा व तार्किकता या संबंधीचा विवेक, वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये यांचा परस्परसंबंध आणि त्यांच्या वापराबाबत करावयाचा विवेक.<br>३. भाषिक, साहित्यिक, सांस्कृतिक संकेत आणि मूल्यव्यवहार<br>४. उपयोजीत समीक्षा : ग्रंथ परिचय, ग्रंथ परीक्षण, ग्रंथ समीक्षा | १ | १५ |

**संदर्भग्रंथ :**


१. साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, वा. ल. कुलकर्णी
२. समीक्षामीमांसा, गंगाधर पाटील
३. मराठीचे साहित्यशास्त्र, मा. गो. देशमुख
४. टीका आणि टीकाकार, वा. भा. पाठक
५. साहित्यविचार आणि सौंदर्यशास्त्र, रा. भा. पाटणकर

६. मराठी समीक्षेची वाटचाल, गो. म. कुलकर्णी

७. सौंदर्यानुभव, प्रभाकर पाध्ये

८. सौंदर्य आणि साहित्य, बा. सी. मर्ढेकर

९. साहित्यातील अधोरेखिते, म. द. हातकणंगलेकर

१०. अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, शरद पाटील

११. मराठी समीक्षेची सद्यस्थिती, वसंत आबाजी डहाके

१२. मराठी समीक्षेची वाटचाल, नीला पांढरे

१३. साहित्याची भाषा, भालचंद्र नेमाडे

१४. टीकास्वयंवर, भालचंद्र नेमाडे

१५. आधुनिक समीक्षा सिद्धांत, मिलिंद मालशे, अशोक जोशी

१६. समीक्षेतील नव्या संकल्पना, संपा. मनोहर जाधव

१७. साहित्य समाज आणि संस्कृती, दिगंबर पाध्ये

१८. मराठी कादंबरीची उपयोजित समीक्षा, गोमटेश्वर पाटील, दर्या प्रकाशन, पुणे

१९. मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, रवींद्र ठाकूर, दिलीपराज प्रकाशन, पुणे

२०. साहित्य संशोधन : वाटा आणि वळणे, डॉ.सुधाकर शेलार,अक्षरवाङ्मय प्रकाशन,पुणे.

२१. साहित्य संशोधन व समीक्षा, राजेंद्र सलालकर

## प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

- साहित्यविचार [DSE 1 B(3)]
- साहित्य समीक्षा [DSE 2 B(3)]

| विद्यापीठ सत्र परीक्षा | | |
|---|---|---|
| वेळ : ३ तास | घटकनिहाय प्रश्न तपशील | गुण : ७० |
| प्रश्न क्रमांक | | गुण |
| प्रश्न १ ला | ३ पैकी २ प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० शब्दांपर्यंत लिहा. ( घटक १,२, ३) | १० |
| प्रश्न २ रा | ३ पैकी २ प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी १५० शब्दांपर्यंत लिहा. (घटक १) | २० |
| प्रश्न ३ रा | ३ पैकी २ प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २०० शब्दांपर्यंत लिहा. (घटक २) | २० |
| प्रश्न ४ था | ३ पैकी २ प्रश्नाचे उत्तर २०० शब्दांपर्यंत लिहा. (घटक ३ ) | २० |
| सत्र परीक्षा एकूण गुण | | ७० |
| अंतर्गत मूल्यमापन | | |
| (घटक-१)<br>१ अभ्यासेतर - अभ्यासपूरक उपक्रम : जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी सहभाग / साहित्यविषयक विशेष योगदान / अभ्याससहल-क्षेत्रभेट अहवाल लेखन / प्रकल्प कार्य / सादरीकरण / स्वाध्याय /चर्चासत्र / गटचर्चा /अभिवाचन | | १० |
| चाचणी (घटक २ आणि ३) | | २० |
| सत्र परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन एकूण गुण | | १०० |

विशेष सूचना :

- अंतर्गत मूल्यमापनाचे नियोजन महाविद्यालयाने करावे.
- विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापनविषयक लेखन / तपशील विद्यापीठाच्या निर्देशानुसार, विहित कालावधीपर्यंत महाविद्यालयाकडे जमा असणे आवश्यक आहे.
- विद्यापीठाच्या निर्देशानुसार विहित मुदतीत गुण विद्यापीठाकडे पाठवावे.